# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०५/२०१८

**१) सोन्याचे दागीण्यांची चोरी :—**

दिनांक १०/०५/२०१८ चे १८.०० ते २३.३० वाजता पर्यत यातील फिर्यादी हे आपले भावाचे घरी जेवन करण्यासाठी गेले असता त्यांचा मुलगा घराचे समोरील दाराला लॉक करुन किचन रुमचा दार खुला ठेवल्याने कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करुन १ सोन्याची चपलाकंठी वजन ४० ग्रॅम, सोन्याचे कानातील झुमके वजन १५ असा एकुण १,१०,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी निसल नाहीर अली वय ४२ वर्ष, रा. जमलाल बजाज वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) सोन्याच्या दागीण्यांची चोरी :—**

दिनांक १०/०५/२०१८ चे १५.२५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. कुंदा भागवत दिघोरे वय ४८ वर्ष, रा. प्लॉट नंबर ४२ नरसाडा रोड किर्ती नगर दिघोरी नागपुर जि. नागपुर ही शिवाजी टिपॉईट लाखांदुर वरुन बारव्हा येथे काळी पिवंळी गाडीने जात असतांना चिचोली गावा जवळ फिर्यादीचे बॅग मधुन १ सोन्याचा मंगळसुत्र वजन २.५ तोडे, २ जोळ सोन्याच्या कुडया ६ ग्रॅम, सोन्याची पुण्यशाही नथ ३ ग्रॅम, असा एकुण ६६,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३)अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २७/०३/२०१५ते ११/०५/२०१८ वाजता पर्यत यातील कोणीतरी अज्ञात ईसमाने भंडारा जिल्हयातील सर्व मा. आमदारांच्या नावाने निनावी पत्र पाठविले की, दिनांक ०१/०४/२०१८ रोजी पेन्शन न मिळाल्यास अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुमच्या नातेवाईक व मित्रांना तुम्हची ईज्जत खराब करणे असे पत्र पाठविल्याने असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०९,५०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) विवाहीतेने शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळुन आत्महत्या केल्याने गुन्हा नोंद :—**

सन २०१७ ते दिनांक ११/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची मृतक भाची तिचे लग्न यातील आरोपी सोबत झाले असुन तो लग्नाचे दीड महीण्यापासुन ते आजपावेतो शुल्लक कारणावरुन शारीरिक व मानसिक त्रास व कृर वागणुक देत होता. घटना ता वेळी व ठिकाणी भाचीने आरोपीचे त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३०६,४९८(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) बोलेरो पिकअप गाडीच्या धडकेत दोन जखमी :—**

दिनांक १०/०५/२०१८ चे २२.४५ वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपी बोलेरो पिकअप चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने निष्काळजीपने चालवुन फिर्यादी व त्याचे मित्र योगेश वंसता गजभिये, गोवील हट्टेवार यांचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ आयटी १५६२ ला समोरुन धडक देवुन फिर्यादी व फिर्यादीच्या मित्रांना जखमी करुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी सचिन रविद्र पुडके वय २३ वर्ष, रा. आमगाव यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) कुऱ्हाडीच्या दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०५/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरापीने फिर्यादीस विनाकारण काही न बोलता मागेहुन येवुन कुऱ्हाडीच्या दांडयाने डोक्यावर, डाव्या खाकेत मारुन जखमी केल्याने फिर्यादी मनोहर बुधाजी चामट वय ६५ वर्ष, रा. कवलेवाडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खैरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) मृत अवस्थेत इसमाचे प्रेत मिळुन आले. :—**

दिंनाक १०/०५/२०१८ चे १९.०० ते दि. ११/५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील मृतक योगश गोंविदा कडव वय ४५ वर्ष, रा. सोमलवाडा हा मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी गोंविदा लक्ष्मण कडव वय ७५ वर्ष, रा. सोमलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला पुढील तपास पोउपनी. जाधव पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) डिलेवरी होवुन झटका आल्याने महिलेचा मृत्यु :—**

दिंनाक ०९/०५/२०१८ चे २१.५० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. कविता पुरुषोत्तम मारबते वय ३५ वर्ष, रा. तिलक वार्ड मोहाडी ही डिलेवरी करीता ग्रामीण रुग्नालय मोहाडी येथुन प्रथम उपचार करुन पुढील उपचारा करीता सामान्य रुग्नालय येथे भरती केले असता दिनांक ०९/०५/२०१८ ला डिलेवरी होवुन झटका आल्याने मरण पावल्याने डा. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निकोसे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**९) विष प्राशन करुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक १०/०५/२०१८ चे २१.१० वाजता दरम्यान यातील मृतक चंदु ग्यानीराम खोब्रागडे वय ४० वर्ष, रा. मोहाडी याने विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय येथे आयसीयु येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १०/०५/२०१८ ला ०९.१० वाजता मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सफौ. केवट यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**१०) गळफास लावुन महिलेचा मृत्यु :—**

दिंनाक १०/०५/२०१८ चे २१.०० ते दि. ११/५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मृनाली रामेश्वर कांबळे वय २३ वर्ष, रा. कोथुर्णा हिने गळयाला साडीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी भुमेश्वर कुंडलीक कांबळे वय ३५ वर्ष, रा. कोथुर्णा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला पुढील तपास पोउपनी. जाधव पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**११) आमरोड वर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०५/२०१८ चे १५.०० ते १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ऑटो वाहन ही मुरमाडी येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल व वाहतुकीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोना. वासनिक पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**१२) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/०५/२०१८ चे २०.२३ वाजता दरम्यान यातील आरोपी याने त्याचे ताब्यातील बोलेरो दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. जनबंधु यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १८५(१) मो.वा.क़ा. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सफौ. शेंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**१३) अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ११/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, आंधळगाव, लाखणी, व पवनी येथे अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३०० लिटर हातभंट्टी दारू+ २६२० किलो सडवा+ साहित्य+ १ मोटार सायकल+ ३ मोबाईल किमती २,१२,४७०/–रु. २ लिटर ७० मिली लिटर देशी दारु किंमती ५९८/–रु. तसेच जुगारातुन कि. ८७,४४५/रु. असा एकुण किंमती ३,००,५१३ /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ११/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २११ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– १० तीन सिटर वाहनाकरीता– १५ ईतर वाहनांवरती – १८६ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिति कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.